आजचा शुभ विचार

""नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वतःच्या ताकदीवर विश्वास ठेवा."आपण जे करतोय किंवा आपल्यात जी ताकद आहे ती ओळखायला शिका. नशिबावर निर्भर राहू नका." डॉ. बाबासाहेब आंबेडकर

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!




मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ■ MARATHI ■ YEAR- 3 ■ ISSUE-48 ■ Published from NASHIK (MAH) ■ Monday 23 June 2025 ■ PAGES 6 ■ Price - 4 Rs.

दैनिक ■ मराठी ■ वर्ष ३ ■ अंक ४८ ■ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ■ सोमवार, दि. २३ जुन २०२५ ■ पाने ६ ■ ₹ ४ रुपये

## “धाराशिवमध्ये मोबदला न देता रिलायन्सचा टॉवर उभारला, विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांना पोलिसांची मारहाण”, राजू शेट्टींचा आरोप

दिपक रोकडे
धाराशिव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------



धाराशिवमध्ये पवनचक्कीच्या वादात शेतकऱ्याला पोलिसांकडून मारहाण झाल्याचं प्रकरण समोर आलं आहे. यावरून शिवसेनेचे (ठाकरे) आमदार कैलास पाटील व स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी पोलीस प्रशासन व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर संताप व्यक्त केला आहे. कैलास पाटील यांनी पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले आहेत. पोलीस कोणासाठी काम करतात? सर्वसामान्य जनतेसाठी की पवनचक्की माफियांसाठी? असा प्रश्न पाटील यांनी उपस्थित केला आहे.

पवनचक्की व विद्युत लाइनसाठी घेतलेल्या जमिनीचा मोबदला द्या अन्यथा काम थांबवा अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली होती. तसेच शेतकऱ्यांनी काम अडवण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, पोलिसांनी शेतकऱ्यांवर अमानुषपणे लाठीचार्ज करत शेतकऱ्यांचं आंदोलन दडपलं. पोलिसांनी शेतकऱ्यांना केलेल्या मारहाणीचे व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहेत. राजू शेट्टी यांनी देखील एक व्हिडीओ पोस्ट करत पोलिसांवरील संताप व्यक्त केला आहे.

राजू शेट्टी यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की “अंबानींचा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी देवाभाऊ (मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तुमचे पोलीसच जर गुंडांची भूमिका पार पडत असतील तर शेतकऱ्याने न्याय मागायचा कुणाकडे? धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील तांदळवाडी येथील गणेश शेरकर या शेतकऱ्याच्या जमिनीवर रिलायन्स रिन्यू पॉवर एनर्जीच्या टॉवर आणि वीजेची लाइन उभारण्याचे काम चालू आहे. शेरकर यांच्या क्षेत्रातून टॉवर व लाईन जात असल्याने त्याचा मोबदला रिलायन्स कंपनी देणार होती. अखेर मोबदला न देता टॉवर उभे केले मात्र सदर टॉवरवर लाईन (वीजेच्या तारा) टाकण्यास शेतकऱ्याने विरोध केला. यावेळी संबधित कंपनीने पोलिसांना पाचारण केले”. राजू शेट्टी म्हणाले, “सदर शेतकऱ्यास मोबदला न देता कंपनीने दडपशाहीने कामास सुरवात केली. शेतकऱ्याने काम अडवल्याने पोलीस उपविभागीय अधिकारी राठोड याने सदर शेतकऱ्यावर लाठीचार्ज केला. यामध्ये गणेश शेरकर, अजय चोरघोडे, राजू कवडे यांना पोलिसांनी मारहाण केली. त्या सर्वांना रात्री दीड वाजेपर्यंत पोलीस ठाण्यात ठेवलं त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. यादरम्यान कंपनीने उभारलेल्या टॉवरवर वीजेच्या तारा जोडण्यात आल्या. रात्री उशिरा या शेतकऱ्यांना सोडण्यात आले. अजूनही या कंपनीने संबधित शेतकऱ्यास पैसे दिलेले नाहीत”.




## शक्तिपीठ महामार्ग विरोधात निर्णयाची अर्धापूरमध्ये होळी

गणेश कदम
नांदेड तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------




शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनासाठी १२ हजार कोटी रुपयांची तरतूद केली असल्याने अत्यल्प भावात होणाऱ्या या भूसंपादन कार्यवाहीस विरोध आहे. या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या निर्णयाची अर्धापूर तालुक्यातील मालेगाव येथील शेतकऱ्यांनी होळी केली. या निर्णयामुळे बाधित १२ जिल्ह्यांमध्ये रोष असून या निर्णयाच्या विरोधात शेतकऱ्यांना एकत्रित केले जात आहे.

गेली दीड वर्षे बाधित शेतकऱ्यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे भूसंपादन प्रक्रिया रखडली होती. आता त्याला वेग देण्यासाठी सरकारी पातळीवरून हालचाली सुरू झाल्या आहेत. नांदेड जिल्ह्यातील शक्तिपीठ महामार्ग विरोधी कृती समितीचे समन्वयक सुभाष मोरलवार, सतीश कुलकर्णी, गजानन तिमेवार, प्रमोद इंगोले, प्रल्हाद इंगोले मारुती सोमवारे, कचरू मुधळ, दिलीप भिसे, शहानंद मुधळ, देवा इंगोले, रवी इंगोले, मारुती इंगोले, दशरथ स्वामी, धोंडीरामजी कल्याणकर, दिलीप कराळे, आनंदराव नादरे, सोनाजी बुट्टे, सुभाष बुट्टे यांच्यासह बाधित शेतकऱ्यांनी मालेगाव येथे मुख्यमंत्र्यांच्या निर्णयाचा निषेध नोंदवला.

## एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेत, एसटी महामंडळाची श्वेतपत्रिका जाहीर होणार

**ओम सोमवंशी**
**मुंबई प्रतिनिधी**
**दैनिक स्वराज्यदूत**

-----------------------



राज्य परिवहन (एसटी) महामंडळाचा सुमारे १० हजार कोटी संचित तोटा आहे. त्याचवेळी सवलत मूल्य प्रतिपूर्ती रक्कमेपैकी एक हजार कोटी रुपये इतकी रक्कम राज्य सरकारने दिली नसल्याने एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर होत नाही. एसटी कर्मचाऱ्यांना वेतन वेळेत मिळण्यासाठी व इतर आर्थिक कामकाजासंदर्भातील एसटी महामंडळाची श्वेतपत्रिका सोमवारी जाहीर होणार आहे. त्यात एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेत होण्यासाठी भरीव तरतूद केली जाणार आहे.

एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती समजून घेण्यासाठी, तसेच भविष्यातील नियोजनासाठी एक आर्थिक श्वेतपत्रिका तयार करावी, असे आदेश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला एप्रिल २०२५ रोजी दिले होते. त्यानंतर दोन महिन्यांनी श्वेतपत्रिका जाहीर केली जाणार आहे.

एसटी महामंडळाचा सुमारे १० हजार कोटी संचित तोटा असल्याने महामंडळाला कर्मचाऱ्यांचे वेतन, वाहन खरेदी, टायर खरेदी, इंधन खरेदी, स्थानकांचे नूतनीकरण व इतर आस्थापना खर्चासाठी दररोज आर्थिक कसरत करावी लागते. कर्मचाऱ्यांची देणी, भविष्य निर्वाह निधीचे हप्ते, कामगार करारातील प्रलंबित देणी यासाठी महामंडळाला पैशाची गरज आहे. त्याचबरोबर महामंडळाला इंधन, वस्तु व सेवा पुरविणाऱ्या संस्थांची थकीत देणीही द्यायची आहेत. या सर्व घटकांचा विचार करून एसटी महामंडळाला सध्या किती उत्पन्न मिळते? किती खर्च येतो? तसेच किती देणी बाकी आहे या सर्वांचा लेखा-जोखा मांडणारी एक श्वेतपत्रिका जाहीर केली जाणार आहे. एसटीची आर्थिक स्थिती हलाखीची झाली आहे. त्यामुळे एसटी महामंडळातील सर्व जमा, खर्च, सर्व प्रस्ताव या सर्व अर्थकारणावर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे नियंत्रण असणार आहे.

एसटी महामंडळाचे आर्थिक संतुलन ठेवून सर्व कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन मिळावे यासाठी आर्थिक शिस्त ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे एक कोटी रुपये किंवा त्यापेक्षा जास्त रक्कमेची सर्व देयके तसेच महामंडळाच्या आर्थिक स्थितीवर भार टाकणारे एक कोटी रुपये व त्यावरील खर्चाचे दायित्व निर्माण करणारे सर्व प्रस्ताव उदा. दर करार स्वीकृत करणे, दर करारास मुदतवाढ देणे, खरेदीची मात्रा वाढविणे, खरेदीचे पुनर्प्रत्याथी आदेश इत्यादी बाबींसाठी यापुढे एसटी महामंडळाचे अध्यक्ष यांची पूर्व मान्यता घेऊनच दायित्व निर्माण करणाऱ्या प्रस्तावावर पुढील कार्यवाही करावी, असा निर्णय परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतला आहे.

> एसटी कर्मचाऱ्यांच्या भल्यासाठी घेण्यात येणाऱ्या प्रत्येक निर्णयाचे स्वागत आहे. त्यामुळे परिवहन मंत्र्यांचा निर्णय योग्य आहे. परंतु, हा निर्णय तात्पुरता नसावा, कायमस्वरूपी असायला हवा. एसटी अधिकारी, कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह व उपदान रक्कम वेतनातून कपात केली आहे. पण निधी अभावी त्या संबंधित संस्थेकडे जमा करण्यात आलेल्या नाहीत.- **श्रीरंग बरगे, सरचिटणीस**

## जळगावात सफाई कर्मचाऱ्यांचा संप मिटल्यानंतरही अस्वच्छता कायम

संदीप पाटील
जळगाव प्रतीनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------



सफाई कर्मचाऱ्यांची ढाल करून थकीत देयकासाठी संपूर्ण शहराला वेठीस धरणाऱ्या कंत्राटदाराला महापालिकेने सुमारे दोन कोटी रुपये दिले. त्यामुळे संपावर गेलेले कर्मचारी कामावर परतल्याचा दावा केला जात असला, तरी शहरात अनेक ठिकाणी अजूनही कचऱ्याचे ढीग साचले आहेत. ज्यामुळे घाणीचे व दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे.

महानगरपालिकेने शहराच्या स्वच्छतेचे कंत्राट नाशिक येथील वॉटरग्रेसला २०१८ मध्ये पाच वर्षांसाठी दिले होते. सदरचे कंत्राट संपल्यानंतरही वॉटरग्रेसला गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात नवीन निविदा प्रक्रिया मंजूर होईपर्यंत काम करण्याच्या अटीवर मुदतवाढ देण्यात आली. प्रत्यक्षात, वेतन थकल्याचे कारण देऊन वॉटरग्रेससाठी काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांनी १७ तारखेपासून काम बंद आंदोलन पुकारले. परिणामी, शहरात प्रचंड कचरा साचला. विविध भागात घंटागाड्या पोहोचल्या नाहीत. अनेक ठिकाणी गटारांची स्वच्छता थांबली. त्यामुळे महापालिका प्रशासनाने वॉटरग्रेसला नोटीस बजावली. साडेतीन लाखांचा दंडही ठोठावला. प्रत्यक्षात, संबंधित कंत्राटदाराला दोन कोटी रुपयांचे थकीत वेतन मिळाल्यानंतरच सफाई कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न सुटला.

वेतन मिळाल्यानंतर सफाई कर्मचाऱ्यांचा संप मागे घेतला जाऊन शहरातील स्वच्छतेला गती मिळण्याची अपेक्षा नागरिक बाळगून होते. परंतु, कर्मचाऱ्यांचा संप मागे घेतला गेल्यानंतरही जळगाव शहरात अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग आणि त्यामुळे पसरलेले घाणीचे साम्राज्य अद्याप कायम आहे. पावसामुळे माशांची उत्पत्ती वाढून दुर्गंधीचे प्रमाणही वाढले आहे. अनारोग्य वाढीस लागल्याने नागरिकांना अतोनात त्रास सहन करण्याची वेळ आली आहे. यासंदर्भात, अधिक माहितीसाठी महापालिकेचे आयुक्त तसेच आरोग्य विभागाच्या सहायक आयुक्तांशी संपर्क साधला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

संपादकीय

# कोणी युती करताय का युती?

एकनाथ शिंदे यांनी तीन वर्षांपूर्वी बंडाचा झेंडा फडकवल्यापासून उबाठा सेनेची सतत घसरण व अधोगती बघायला मिळत आहे. राहुल गांधी व शरद पवार यांच्या मदतीने उद्धव ठाकरे यांनी राज्याचे मुख्यमंत्रीपद मिळवले. पण अडीच वर्षांतच त्यांना एककल्ली वागणुकीमुळे सर्वोच्चपदावरून पायउतार व्हावे लागले. राज्याची सत्ता गेली. पक्षाचे नाव, चिन्हही गेले आणि देशातील सर्वांत श्रीमंत असलेल्या मुंबई महापालिकेतील सत्तेलाही ग्रहण लागले. मुंबई महापालिकेवर अविभाजित शिवसेनेने शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्याईने पंचवीस-तीस वर्षे सत्ता उपभोगली. पण शिवसेनाप्रमुखांच्या हयातीनंतर पक्षाला मोठी गळती लागली. चार महिन्यांवर राज्यात महापालिका, जिपच्या निवडणुका अपेक्षित आहेत. वाट्टेल ते करून मुंबई महापालिकेची सत्ता कशी मिळवायची, या प्रश्नाने उबाठा सेनेतील नेत्यांची व पक्षप्रमुखांची झोप उडाली आहे. उबाठा सेनेतील बहुतेक सर्व दिग्गज नेते शिवसेनेत किंवा भाजपात गेले आहेत. शिल्लक सेनेला बरोबर घेऊन पुन्हा सत्ता मिळवता येणार नाही, याची उद्धव ठाकरे यांना पूर्ण जाणीव आहे, म्हणूनच राज ठाकरे यांच्या मनसेने महापालिका निवडणुकीसाठी उबाठा सेनेशी युती करावी म्हणून त्यांना आळवणी करण्याची पाळी उद्धव यांच्यावर आली आहे.

गेले दोन-तीन महिने उबाठा सेनेकडून मनसेचे लक्ष वेधण्यासाठी सतत प्रयत्न केले जात आहेत. उबाठा सेनेच्या मुखपत्रातून उद्धव व राज एकत्र असलेले छायाचित्र प्रसिद्ध करून जणू दोघे बंधू आता मनाने एकत्र आलेले आहेत, अशी हूल उठविण्यात आली. राज ठाकरे यांनी वेगळा पक्ष स्थापन केल्यापासून कधी नव्हे ते उद्धव यांना त्यांची राजकीय गरज भासू लागली आहे. उबाठा सेनेच्या सैनिकांनाही उद्धव - राज एकत्र येणार, म्हणून पक्षातून मधाचे बोट लावण्यात आले आहे. दि. १९ जूनला शिवसेना पक्षाचे दोन वर्धापन दिन मुंबईत साजरे झाले. उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचा वर्धापन दिन शीव येथील षण्मुखानंद सभागृहात, तर एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचा वरळी डोममध्ये साजरा झाला. या दोन्ही मेळाव्यात मनसेची संभाव्य युती हा कळीचा मुद्दा राहिला. महापालिका निवडणुकीत राज ठाकरे कुणाबरोबर जाणार की स्वबळावरच लढणार? हे अद्याप गूढ आहे. ते स्वत: या विषयावर काहीच बोलत नाहीत. पण युतीचा मुद्दा निघाला की त्यांचे शिलेदार इतकी वर्षे उद्धव ठाकरे यांनी मनसेला कशी वागणूक दिली असा प्रश्न विचारून अनेक उदाहरणांचा पाढा उगाळतात. उबाठा सेना व मनसे यांच्या युतीच्या चर्चेला उधाण आले असतानाच मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई पश्चिम उपनगरातील पंचतारांकित हॉटेलमध्ये भेट घेतली आणि उबाठा सेनेबरोबर युतीच्या चर्चेला तडा गेला. षण्मुखानंद सभागृहातील मेळव्यात उद्धव ठाकरे यांनी मनसेबरोबर युतीच्या मुद्द्यावर बोलताना जे महाराष्ट्रातील जनतेच्या मनात आहे, तेच होईल असे वक्तव्य केले. या विषयावर निर्णय घेण्यास आम्ही सक्षम आहोत, इतरांनी त्याची चिंता करू नये, असेही त्यांनी बोलून दाखवले. उबाठा सेना व मनसे युतीविषयी भाजपाचे नेते बोलताना, दोन्ही भाऊ एकत्र येत असतील तर ते चांगलेच आहे, अशी भूमिका मांडताना दिसतात. पण त्यांना नक्की ठाऊक आहे, हे दोघे बंधू एकत्र येण्याची शक्यता कमी आहे. उद्धव यांच्याकडून राज ठाकरे एकदा नव्हे तर अनेकदा कमालीचे दुखावले गेले आहेत, हे त्यांना कधीही विसरता येणार नाही. अविभाजित शिवसेनेत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हयात असताना पक्षात राज यांचे महत्त्व वाढता कामा नये, याची दक्षता उद्धव यांनी नेहमीच घेतली होती. निर्णय प्रक्रियेत राज यांना डावलण्यात येत होते. उमेदवार निवडताना राज यांच्या शिफारसीला किमत दिली जात नव्हती. राज यांनी स्वत:चा वेगळा राजकीय पक्ष स्थापन केला, त्यामागे अनेक कारणे आहेत. पण उद्धव यांनी आपल्या भावाची कदर कधीच केली नाही. राज ठाकरे यांनी आपला स्वतंत्र पक्ष स्थापन केल्यापासून उद्धव व राज यांच्यात कधीच सुमधुर संबंध नाहीत. एवढेच नव्हे तर शिवसेनाप्रमुख हयात असताही ते नव्हते. उद्धव यांनी पक्षात सर्वकाही हातात घेतल्यापासून दोघा भावांमध्ये दुरावा आहे. शिवसेनाप्रमुखांच्या अंत्ययात्रेतही राज यांना अवमानकारक वागणूक मिळाली होती हे कसे विसरता येईल?

उबाठा सेनेला युतीसाठी घाई झाली असली तरी मध्यस्थ कोण आहे, एवढा परिपक्व, विश्वासू व दोघांनाही मान्य होईल असा नेता दोन्ही पक्षांत नाही. युती झाली तर बॉस कोण? जागा वाटप कसे होणार? दोघांची मदार मराठी मतांवर. मग माघार कोण घेणार? गेल्या वीस वर्षांत दोन्ही पक्षांत नवीन नेतृत्व निर्माण झालेले नाही. दोन्ही पक्षप्रमुख हेच दोन्ही पक्षांत सुप्रीम आहेत व त्यांच्याभोवतीच सारा पक्ष फिरताना दिसतो आहे. जरी दोन्ही पक्ष युती करायला तयार झाले तरी भाजपा त्यांना एकत्र येऊ देईल का? हा सर्वांत मोठा व कळीचा मुद्दा आहे.

राज्यात व केंद्रात भाजपा सत्तेवर आल्यापासून मराठी माणसाची अवस्था वाईट झाली आहे. मराठी माणूस, मराठी भाषा व मराठी अस्मिता यांची गळचेपी चालू आहे. महाराष्ट्राला अवमानास्पद वागणूक मिळत आहे म्हणून मराठी माणसासाठी व महाराष्ट्राच्या हितासाठी उद्धव व राज यांनी एकत्र यावे अशी भावनिक मोहीम चालवली जात आहे. आमच्या वादांपेक्षा मराठी माणूस व महाराष्ट्र हित मोठे आहे असेही उबाठा सेनेने आवाहन केले आहे. ठाकरे बंधूच मराठी माणसाला वाचवू शकतील असे सांगण्यात आहे. पण या भावनिक जाळ्यात मनसे अडकणार नाही किंवा मनसेची तशी मानसिकता नाही असे आजचे तरी चित्र आहे.

मनसेबरोबर युती व्हावी यासाठी उबाठा सेना अगतिक झाली आहे. उबाठा सेनेला खूप घाई झाली आहे. एकनाथ शिंदे यांच्यात शब्दांत सांगायचे तर उबाठा सेना लाचार झाली आहे. ठाकरे बंधू एकत्र येणार म्हणून राज्यात काही ठिकाणी पोस्टर्सही झळकले. मनसे सैनिकांच्या बरोबर उबाठा सेनेच्या सैनिकांच्या भेटी-गाठी वाढल्या आहेत. मनसे नेते भेटल्यावर उबाठा सेनेचे पदाधिकारी गळाभेटी घेत आहेत. पण हे सर्व एकतर्फी चालू आहे असे दिसते. एकीकडे भाजपा हा महाराष्ट्र व मराठी विरोधी आहे असे चित्र निर्माण करायचे व दुसरीकडे मराठी माणसाला वाचविण्यासाठी ठाकरे बंधूंनी युती करणे गरजेचे आहे असे सांगायचे अशी दुहेरी प्रचार मोहीम उबाठा सेनेकडून चालू आहे. मात्र उबाठा सेनेच्या आवाहनाला मनसेचा प्रतिसाद थंड आहे.

मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, वसई - विरार, मीरा - भाईंदर, अंबरनाथ तसेच पुणे, पिंपरी - चिंचवड, छ. संभाजी नगर, नाशिक अशा प्रमुख महापालिकांमध्ये मराठी मतांचे विभाजन होऊ नये यासाठी उबाठा सेना मनसेला बरोबर घेण्यासाठी उतावीळ झाली आहे. एकनाथ शिंदे यांची शिवसेना, उद्धव ठाकरे यांची उबाठा सेना आणि राज ठाकरे यांची मनसे असे तिन्ही पक्षांत मराठी मताचे विभाजन झाले, तर उबाठा सेनेचे सर्वाधिक नुकसान होणार आहे. भाजपा, काँग्रेसकडेही मराठी मतांचा टक्का आहे हे विसरून चालणार नाही. मराठी मतदारांची एकगठ्ठा मते एकाच पक्षाकडे अशी स्थिती नाही. भाजपाला मराठी मतांबरोबरच अमराठी मतांचा मोठा लाभ मिळतो ही या पक्षाची मोठी जमेची बाजू आहे. राज ठाकरे यांच्या संपर्कात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जसे आहेत तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी केंद्रीयमंत्री व खासदार नारायण राणे, भाजपाचे अनेक नेते नियमित असतात. तसे उबाठा सेनेतून राज यांच्या संपर्कात उघडपणे कोण असते? आता महापालिका निवडणुकीसाठी उबाठा सेनेला एकदम राज ठाकरे यांच्या पक्षाची गरज भासू लागली यामध्ये स्वार्थाशिवाय दुसरे काय असू शकते

सन २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीनंतर उद्धव ठाकरे काँग्रेसबरोबर गेले, मुख्यमंत्री झाले. तेव्हा निर्णय घेताना त्यांनी मतदारांना, पक्षातील पदाधिकाऱ्यांना किंवा शिवसैनिकांना कोणाला विश्वासात घेतले होते? तेव्हा मतदारांना विचारले होते का? तेव्हा राज ठाकरे यांना बोलावून चर्चा केली होती का, मनसेला काय वाटते अशी विचारणा केली होती का? शिवसेना पक्ष व चिन्ह हातातून गेले. फूट पडली. जेमतेम २० आमदार निवडून आले म्हणून उद्धव यांना राज यांची आठवण होते आहे का? चारच महिन्यांपूर्वी मनसेच्या कार्यकर्त्यांनी शिवसेनाप्रमुखांचे फोटो लावले म्हणून उबाठा सेनेच्या नेत्यांनी व प्रवक्त्यांनी आक्षेप घेतला होता, मग आता एकदम मनसेची उबाठा सेनेला उचकी का लागते आहे? खरी शिवसेना कोणती हे एकनाथ शिंदे यांनी लोकसभा व विधानसभा निवडणुकीत दाखवून दिले आहे, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पुन्हा एकदा मुंबईत येऊन ठणकावून सांगितले, यातच उबाठा सेनेने आपले भविष्य काय आहे हे समजून घ्यावे... कम ऑन किल मी... असे आवेशात आव्हान द्यायचे, अंगावर यायचे तर येताना ॲम्ब्युलन्स घेऊन या असे सांगताना, जाताना आडवे होऊन जाल अशी भाषा वापरायची, मग एवढी ताकद आहे, तर मनसेने युती करावी यासाठी अगतिकता कशासाठी? ७६ हजार कोटींचे बजेट असलेल्या मुंबई महापालिकेची निवडणूक ही उबाठा सेनेच्या अस्तित्वाची लढाई आहे म्हणूनच कोणी युती करताय का युती? असे विचारण्याची पाळी आली आहे...

# मुक्रमाबाद पोलिसांची धाडसी कार्यवाही अवैधरित्या वाळू उपसा करून नेणारी हायवा ट्रक जप्त केली

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

--------------------



मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये दिनांक 20 जून शुक्रवार रोजी पहाटेच्या सुमारास दापका गुंडपंत शिवारात हायवा ट्रक मधून अवैद्यरित्या वाळू उपसा करून चोरी करणाऱ्या इसमावर कार्यवाही करून 28 लाख 45 हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात मुक्रमाबाद पोलिसांना यश आले.

मुक्रमाबाद पोलिसांनी पेट्रोलिंग करत असताना दापका (गुं) शिवारात रोडवर अवैद्य रेतीची चोरटी वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली दरम्यान हायवा ट्रक क्रमांक एम एच 26 सीएच 6767 मध्ये लाल रेतीची नऊ ब्रास 45 हजार किमतीची विनापरवाना बेकायदेशीर रित्या चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतूक करत असताना 28 लाख 45 हजाराचा मुद्देमाल मिळून आल्याने सदर आरोपी विरुद्ध कलम 303 (2) सह कलम 48 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाने अप्पर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे, अप्पर पो अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय अधिकारी संकेत गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली मुक्रमाबाद पोलीस स्टेशनचे नवनियुक्त सहा पोलीस निरीक्षक राजू चव्हाण यांच्या नियंत्रणात पो उ प नी मोरे व सपोउनी कदम यांच्या परिश्रमाने अवैध वाळू उपसा करून चोरी करणाऱ्या इसमा विरुद्ध कार्यवाही केली. सदरची उत्कृष्ट कामगिरी केल्याने पोलीस अधीक्षक नांदेड यांनी मुक्रमाबाद पोलीस पथकाचे कौतुक करून अभिनंदन केले.

# साधू महाराजांच्या पायी दिंडीस लोह्यात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाकडून अल्पोपहाराचे वाटप

गोविंद ढगे
लोहा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------



मागील तीनशे वर्षांपासून कंधार संस्थान चे श्री. साधू महाराज यांची हजारो वारकऱ्यांची पायी दिंडी कंधार ते पंढरपूर अविरत सुरू आहे. सदरील दिंडीतील वारकऱ्यांना लोहा तालुका महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने शुक्रवारी सकाळी अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

कंधार ते पंढरपूर अशी पायी दिंडीची परंपरा असलेल्या कंधार संस्थांनच्या श्री संत साधू महाराज यांची पायी दिंडी दि. १९ रोजी गुरुवारी लोहा शहरातील देऊळगल्ली येथे पहिल्या मुक्कामास होती. दि. २० रोजी सकाळी सदर दिंडी पंढरपूर कडे मार्गस्थ होण्यापूर्वी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंदजी वाकडे यांच्या आदेशानुसार जिल्हाध्यक्ष संग्राम पाटील मोरे यांच्या नेतृत्वाखाली पायी दिंडीतील वारकऱ्यांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. प्रारंभी पत्रकार संघाकडून दिंडीतील प्रमुख एकनाथ महाराज कंधारकर यांचे चरण धुवून त्यांचे पुष्पहाराने स्वागत केले. यावेळी पत्रकार संघाकडून चहा, बिस्किटे, पाणी बॉटल, केळी आदींचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी संघाचे मराठवाडा उपाध्यक्ष सुरेश जोंधळे, निवड समितीचे जिल्हाध्यक्ष केशव पवार, उपाध्यक्ष सुनील चव्हाण, गणपत जामगे, तालुका पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष विशाल घंटे, संग्राम चव्हाण, हनुमंत पांचाळ, सुनील पवार, माधव ससाणे, गजानन दांगटे,शिवहार गालफाडे, माधव पांचाळ, रमेश पवार, व्यापारी तुकाराम सावकार कोटलवार, संजय चव्हाण, संतोष दमकोंडवार, दिलीप पांचाळ, शंकर शेटे, सखाराम राजमाने आदींसह बहुसंख्य उपस्थिती होती.

# धुळे येथे आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------






दरवर्षीप्रमाणे यंदा देखील २१ जून २०२५ रोजी पोलीस कवायत मैदान धुळे येथे सर्व समावेशक आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

धुळे विधानसभा आमदार अनुप भैय्याअग्रवाल, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद धुळे चे विशाल नरवाडे, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धीवरे, मनपा आयुक्त अमिता दगडे पाटील, भाजपा अध्यक्ष गजेंद्र आंपळकर, राजवर्धन कदमबांडे, डॉ. सुभाष भामरे, डॉ.सुशील महाजन, शिक्षणाधिकारी मनीष पवार, जिल्हाक्रीडा अधिकारी अविनाश टिळे, एनसीसीचे कर्नल एस के गुप्ता यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात झाली.

संयोजन समिती धुळे चे प्रमुख व भाजपा सरचिटणीस धुळे माननीय ओम प्रकाश खंडेलवाल यांच्या मार्गदर्शनात सुमारे सात हजाराच्या संख्येने अबाल वृद्ध नागरिक विद्यार्थी इत्यादींनी शिस्तबद्ध रीतीने सहभाग नोंदवला महिला वर्गाने मोठ्या संख्येने उपक्रमात उत्साहाने सहभाग घेतला. शासकीय निमशासकीय खाजगी आस्थापनातील अधिकारी व कर्मचारी यांनीही योग प्रात्यक्षिकात सहभाग नोंदवला.

प्रमुख मान्यवरात ओम प्रकाश खंडेलवाल, सुधाकर दादा बेंद्रे, यशवंत पाटील, बालब्रह्मचरणी रिटा दीदी, राजेश वाणी , भारत स्वाभिमान्यास प्रीतम सिंग ठाकूर, विजय पवार, प्रभाकर शिंदे ,युवराज करनकाळ, रवी बेल पाठक , संतोष शेठ अग्रवाल, विनोद शेठ अग्रवाल, डॉ. जितेंद्र भामरे, जितेंद्र चौवटीया, एन. के. उपाध्ये, कविता दीदी, अशोक शिंदे, रामकृष्ण खलाणे, डॉ. भूपेंद्र मालपुरे, अतुल दहिवेलकर, डॉ. भालचंद्र मोरे हे उपस्थित होते.

धुळे विधानसभा आमदार अनुप भैय्या अग्रवाल व जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी सर्वांना आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मार्गदर्शन केले. ओम प्रकाश खंडेलवाल यांनी प्रास्ताविक केले पतंजली योग समितीचे डॉ.राजेंद्र निकुंभ यांनी योग प्रात्यक्षिकाचे संचलन केले, अमित गोराणे यांनी आभार मानले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याणी कच्छवा यांनी केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी मनोहर चौधरी, राकेश जैन, एडवोकेट वाय. एल.जाधव, राजेंद्र बारे, प्रकाश पांडे ,नरेंद्र मराठे, रवींद्र निकम, मोनाली पगारे ,राजश्री शेलकर ,किरण मांडे ,गुलाब ठाकरे ,दिलीप बागुल, रेखा पाटील, योगेश्वरी मिस्तरी , स्वप्नील बोढे ,सुनील कपिल, विजय सिंग सिसोदिया , कमलाकर पाटील, योगेश देवरे, उमेश मुसळे, वैशाली पाटील, उर्मिला पाटील , निकिता चौधरी, राजेश सूर्यवंशी यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमानंतर अल्पोप आहाराचे वाटप करण्यात आले. योग दिन संयोजन समितीच्या सर्व सदस्यांनी केलेल्या एकत्रित परिश्रमामुळे कार्यक्रम शिस्तीत व उत्साहात संपन्न झाला.

# वाढत्या गुन्हेगारीमुळे नाशिकमध्ये वरिष्ठ निरीक्षकांच्या बदल्या

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत



शहरातील प्राणघातक हल्ले, टोळक्यांचा धुडगूस, लूटमार, वाहनांची तोडफोड, सोनसाखळी खेचून नेणे, आदी गुन्हेगारी घटनांचा आलेख वाढतच असल्याने गुन्हेगारी रोखण्यासाठी आयुक्तालयातर्फे तडकाफडकी ११ पोलीस ठाण्यांमधील वरिष्ठ निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या. त्यात काही निरीक्षकांना दुय्यम पदावर नियुक्ती देण्यात आली आहे.

शहरातील वाढती गुन्हेगारी हा काही दिवसांपासून चर्चेचा विषय झाला आहे. जानेवारी ते मे या पाच महिन्याच्या कालावधीत २५ हत्यांची नोंद झाली आहे. गुन्हेगारांच्या अनेक टोळ्या निर्माण झाल्या असून दहशतीसाठी त्यांच्याकडून वाहनांची तोडफोड, लूटमार, रात्री उशिरापर्यंत चौकांमध्ये धुडगूस असे प्रकार केले जातात. वाढत्या गुन्हेगारीविरुध्द नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला असताना शिवसेनेने (उध्दव ठाकरे) नाशिकरोड परिसरात स्वाक्षरी मोहीम सुरु केली. तसेच मनसेने आंदोलनाचा इशारा दिला. काही वरिष्ठ निरीक्षक, कर्मचारी अनेक वर्षांपासून एकाच ठिकाणी ठाण मांडून असल्याने पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी निरीक्षकांच्या बदल्या केल्या. यानुसार पंचवटीचे मधुकर कड यांची अंबड पोलीस ठाणे, भद्रकालीचे गजेंद्र पाटील यांची पंचवटी, अंबडचे गजेंद्र पाटील यांची भद्रकाली, उपनगरचे जितेंद्र सपकाळे यांची नाशिकरोड, नियंत्रण कक्षातील संजय पिसे यांची आडगाव, देवळाली कॅम्पचे जयंत शिरसाठ यांची उपनगर पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली.

याशिवाय काही वरिष्ठ निरीक्षकांना दुय्यम पदांवर नियुक्ती देण्यात आली. त्यात सातपूरचे विश्वास पाटील यांची चुंचाळे पोलीस चौकी, आडगावचे सचिन खैरनार आणि चुंचाळे चौकीचे मनोहर कारंडे यांची अंबड, भद्रकालीचे श्रीनिवास देशमुख यांची देवळाली कॅम्प आणि नाशिकरोडचे अशोक गिरी यांची सरकारवाडा पोलीस ठाण्यात नियुक्ती करण्यात आली. अंबडचे वरिष्ठ निरीक्षक राकेश हांडे यांना पुढील आदेश होईपर्यंत नियंत्रण कक्ष येथे ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. संबंधित प्रभारी अधिकाऱ्यांनी तत्काळ कामाच्या ठिकाणी हजर व्हावे, असे आदेश आयुक्त कर्णिक यांनी दिले आहेत.

# कल्याण रेल्वे स्थानकात चार लाखाच्या गांजासह दोन तरुणांना अटक

ठाणे प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत



कल्याण रेल्वे स्थानकात बुधवारी दुपारी तीन वाजता कल्याण रेल्वे गुन्हे शाखा, लोहमार्ग पोलीस, मुंबई यांच्या पथकाने संयुक्त कारवाई करून मुंब्रा, कर्नाटकातील दोन इसमांकडून २१ किलो वजनाचा चार लाख १७ हजार रूपये किमतीचा गांजा जप्त केला. या दोन्ही इसमांना गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली आहे.

मेहताब आलम इशराद आलम शेख (३५, रा. गॅलेक्सी सोसायटी, खान कम्पाऊंड, मुंब्रा, ठाणे , लाल अहमद मोहम्मद अमीन कोटकी (२७, रा. बंदेनवाज दर्गा, काळाघोडा, मतीन का घर, जि. कलबुर्गी, कर्नाटक) अशी अटक आरोपींची नावे आहेत. ते ओरिसा राज्यातून पुरी एक्सप्रेसने बुधवारी दुपारी तीन वाजता कल्याण रेल्वे स्थानकात उतरले होते.

लोहमार्ग पोलीस, रेल्वे सुरक्षा बळाच्या जवानांची रेल्वे स्थानक परिसरातील अवैध धंदे, अंमली पदार्थ तस्करी, भुरट्या चोऱ्या रोखण्याविरुध्द मोहीम सुरू आहे. या मोहिमेंतर्गत पोलिसांचे विशेष पथक फलाट क्रमांक पाचवर गस्त घालत होते. या दरम्यान पुरी एक्सप्रेस फलाट क्रमांक पाचवर आली. प्रवासी एक्सप्रेसमधून उतरून पिशव्या घेऊन रेल्वे स्थानकाबाहेर पडत होते. या प्रवाशांमध्ये दोन इसमांकडे अवजड पिशव्या होत्या. त्यांच्या हालचाली पोलिसांना संशयास्पद वाटल्या. त्यांच्याकडे अंमली पदार्थ असण्याचा संशय पोलिसांना आला. पोलीस पथकाने त्यांना थांबविले आणि त्यांच्याजवळील पिशव्यांची तपासणीची मागणी केली. त्यावेळी दोन्ही प्रवासी गांगरले. त्यांनी तपासणीला नकार देऊन तेथून निघून जाण्याचा प्रयत्न केला, पोलिसांनी त्यांना रोखले. पोलिसांनी मेहताब शेख, लाल कोटकी यांच्या जवळील पिशव्यांची तपासणी केली. या दोघांच्या पिशव्यांमध्ये एकूण २१ किलो गांजा आढळून आला. या गांजाची बाजारामधील किंमत चार लाखाहून अधिक असल्याचे पोलिसांना समजले. या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांच्यावर कल्याण लोहमार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. त्यांना अटक केली.

दोन्ही आरोपींनी हा गांजा आम्ही ओरिसा जिल्ह्यातील संबलपूर येथून आणला आहे, अशी कबुली पोलिसांना दिली. हे दोघे मुंबई कल्याण परिसरात हा गांजा कोणाला विक्री करणार होते. त्यांनी यापूर्वी अशाप्रकारे पराराज्यातून गांजाची किती वेळा रेल्वेमधून तस्करी केली आहे, यादृष्टीने पोलिसांनी तपास सुरू केला आहे. या दोघांच्या अटकेमधून गांजा तस्करांची एक मोठी टोळी उघड होण्याची शक्यता पोलिसांना आहे.

ही कारवाई कल्याण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय खेडकर, पोलीस निरीक्षक रोहित सावंत यांच्या नेतृत्वाखाली साहाय्यक पोलीस निरीक्षक गणपत सुळे, उपनिरीक्षक सुधाकर सावंत, अंमलदार राम जाधव, अजय रौंधळ, स्मिता वसावे, जनार्दन पुलेकर, पद्मा केंजळे, प्रमोद दिघे, स्वप्निल नागरे, हितेश नाईक, रवींद्र ठाकुर, लक्ष्मण वळकुंडे, रुपेश निकम, सुनील मागाडे, रेल्वे सुरक्षा बळाचे गौरीशंकर एडले, विजय इंगळे, प्रधान आरक्षक निळकंठ गोरे, ओमप्रकाश रामभगत, हरीओम गुजर, विनय सिंग यांच्या पथकाने केली.

# सटाण्यातील रायरेश्वर मंदिरात होतोय राष्ट्रजागर श्री बिंदू शेठ शर्मा

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत



सटाणा शहरातील रायरेश्वर महादेव मंदिरामध्ये मोठ्या संख्येने भाविक दररोज सकाळी १०.०० वाजता व सायंकाळी ७.०० वाजता आरतीसाठी एकत्र येतात. परिसरातील रहिवासी इथे येऊन आपली सेवा देतात. मंदिराचा परिसर अतिशय सुंदर स्वच्छ व झाडा फुलांनी सजवण्यात आला आहे.

दिवसभर आपआपली कामे आटवून सायंकाळी फक्त एक तास सर्वजण महाआरतीसाठी मोठ्या आनंदाने एकत्र येतात. यामुळे परिसरातील वातावरण मंगलमय झाल्याचे जाणवते. सदर आरतीच्या वेळी बालगोपाळांवर संस्कार व्हावेत या हष्टीने आठवड्यातून एक दिवस गुरुवारी मान्यवरांना आमंत्रित करून त्यांच्यातर्फे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन देखील केले जाते. संस्कारक्षम गोष्टी बोधकथा सांगितल्या जातात. महिलांमध्ये देखील भजन कीर्तन यासारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.दररोज सायंकाळी महिला हरिपाठासाठी एकत्र येतात.

विविध राष्ट्रपुरुषांच्या जयंती पुण्यतिथी सन समारंभ यासारखे उत्सव सर्व मिळून एकत्रितपणे मंदिर परिसरात सादरी केले जातात. यामुळे नागरिकांमध्ये एकतेची भावना निर्माण होण्यास मदत होत आहे. एकमेकांच्या सुखदुखात लोक सामील होतात. या दोन राष्ट्रनिर्माणाची कार्य मोठ्या प्रमाणात घडून येत आहे. "अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, राष्ट्रीभिमान , पर्यावरण जागरण, पाणी व अन्न यांची नासाडी टाळणे यासारख्या समाज पूरक उपक्रमांची जागृती या जागृती मधून होत आहे.

अशा प्रकारची उपक्रम ठीक ठिकाणी परिसरामध्ये कॉलनीमध्ये मोकळ्या जागेत मंदिरांमध्ये व्हायला हवेत. यामुळे समाजाची योग्य जडणघडण होण्यास निश्चित मदत होईल. पर्यायाने निकोप व बलशाली राष्ट्र बनण्यास हातभार लागेल".

असे मत भाजपा किसान मोर्चा प्रदेशाध्यक्ष श्री बिंदू शेठ शर्मा यांनी व्यक्त केले.

असे आवाहन ह. भ. प. परिमल(माऊली) जोशी यांनी केले आहे.कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री. कल्पेश धामणे, गणेश भामरे, महाजन सर, किरण दशमुखे, किरण अहिरे, किरण नांद्रे, अमोल धामणे, आशिष हेडे, राजेंद्र सोनवणे, योगेश शिरोडे, सौ. सुमन सोनवणे, अर्चना सोनवणे, शोभा धामणे, कोर ताई, वैष्णवी दुबे, आदी सर्व रायरेश्वर भाविक मंडळ प्रयत्नशील आहे.

# नूतन मराठा विद्यालयात योग दिन उत्साहात साजरा

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत





दिनांक २१ जून २०२५ रोजी नूतन मराठा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय छडवेल कोर्डे येथे सकाळच्या प्रसन्न वातावरणात योगशिक्षकांच्या उपस्थितीत विद्यार्थी व शिक्षक बंधू यांनी योग अभ्यास करून करून *"आंतरराष्ट्रीय योग दिवस"* साजरा करण्यात आला.

महाराष्ट्र योग शिक्षक संघाचे *तज्ञ योगशिक्षक श्री.हेमंत जाधव यांनी एम.ए.योगिक सायन्स ही पदव्युत्तर पदवी क.ब.चौ विद्यापीठ, जळगाव येथून तर डिप्लोमा इन योगा ही पदविका वाय.सी.एम मुक्त विद्यापीठ, नाशिक येथून प्राप्त केले आहेत*.प्रास्ताविकात त्यांनी विद्यार्थ्यांशी बोलताना विकसनशील भारताचे स्वप्न पाहण्यासाठी गावागावातील, खेड्यापाड्यातील समाजमन विकसित झाले पाहिजे त्यासाठी खेड्यापाड्यातील समाजाचे मन आनंदी करणे गरजेचे आहे. आज कालच्या धावपळीच्या, ताण-तणावाच्या आणि स्पर्धेच्या युगामध्ये सर्व प्रकारचे भौतिक सुख मिळविण्याच्या प्रयत्नात माणसाचे आरोग्य पर्यायाने समाजाचे आरोग्य खालावत चालले आहे ते जर आरोग्यदायी करावयाचे असेल तर आपल्या पूर्वतः पारंपारिक राहणीमान, जीवनपद्धती अंमलात आणणे गरजेचे आहे,त्यासाठी गावातील प्रत्येक व्यक्तीची शारीरिक क्षमता, मानसिक आनंद वाढविण्याचे आवश्यक आहे. आणि हे जर करावयाचे असेल तर प्रत्येक गावात आठवड्यातून एकदा आसन,प्राणायाम, शिबिर घ्यावी लागतील. आज सर्व जगाला योगाचे महत्त्व कळाले आहे त्याच्यावर अंमलबजावणी करून योग वर्ग घेऊन गावातील, समाजातील प्रत्येक घटकाचे आरोग्यदायी मन आपण विकसित करू शकू.

Yoga For One Earth One Health

योग म्हणजे केवळ आसने नाही, योग म्हणजे फक्त शरीराचे वाकवणे नव्हे तो शरीर मन आणि श्वास यांचा समन्वय आहे. योगात आसन, प्राणायाम,ध्यान, शांत बसणे ही सर्व तत्वे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर आणि मानसिक स्थैर्यावर सकारात्मक परिणाम घडवतात.योग हे शिक्षणात पूरक ठरणारे साधन आहे तर शाळांमध्ये योगशिक्षणाचा समावेश आवश्यक आहे .अभ्यासक्रम जितका महत्त्वाचा तितकाच मानसिक संतुलन,आत्मनियंत्रण आणि आत्मविश्वास यांचा विकास सुद्धा आवश्यक आहे. आणि शाळांमध्ये नियमित योगाभ्यास सुरू झाला तर याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या आकलनशक्ती, वर्तन आणि आरोग्यावर झाल्याचे दिसून येईल हे मी माझ्या आजवरच्या अनुभवातून ठामपणे सांगू शकतो.योग हे विद्यार्थ्यांसाठी केवळ व्यायाम नसून स्वस्थ, सुदृढ आणि यशस्वी जीवनाचे मूळ सूत्र आहे. विद्यार्थ्यांनी योगाला जीवनाचा भाग बनवावे, कारण

"निरोगी शरीरातच तेजस्वी मन असते"

आज पासून सुरुवात करा योग करा आरोग्य कमवा आणि यशाच्या वाटेवर पुढे चला.

विद्यालयाचे प्राचार्य माननीय रावसाहेब संजय कुमार पाटील यांनी आपल्या मनोगतात दीवार चित्रपटातील डायलॉगच्या स्टाईल मधे

"तेरे पास क्या है? मेरे पास आरोग्य धनसंपदा है!" आरोग्य बाबतचा एक छान संदेश विद्यार्थ्यांसमोर मांडला.

या योग दिनाच्या निमित्ताने तज्ञ योगशिक्षक हेमंत जाधव, विद्यालयाचे प्राचार्य मा.रावसाहेब संजयकुमार पाटील, पर्यवेक्षक मा.रघुनाथ नागरे शिक्षक प्रतिनिधी श्री.हरकलाल पवार, शिक्षकेतर प्रतिनिधी श्री.सिद्धार्थ मोहिते भाऊसाहेब ज्यु.कॉलेज प्रतिनिधी श्री.महेश सावंत,सर्व शिक्षक व शिक्षकेतर बंधु आणि भगिनी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.अशोक पाडवी यांनी केले.

# "नेत्यांनी वाटला समाज, आम्ही आता उभा करणार लढा!" पोवार समाजाची प्रचंड गर्जना

## जातीय विलिनीकरणाच्या कटाविरोधात कडाडून एल्गार!
## खोट्या ऐक्याच्या कार्यक्रमाला गोंदिया येथे थेट धोक्याचा इशारा!

देवेन्द्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधि
दैनिक स्वराज्यदूत




गोरेगाव येथे पत्रकार परिषद जैन रेस्टॉरंट मध्ये खुलासा नेते मोठे झाले, समाज मात्र छोटा झाला! पोवार समाजाच्या पिढ्यानपिढ्या एकतेवर, अस्मितेवर आणि इतिहासावर कळस चढवणाऱ्या या तथाकथित "मोठ्या" नेत्यांनी आजवर समाजाचे केवळ तुकडे केले, मार्ग नाही दाखवला. नेते आले, नेते गेले... पण समाज मात्र आजही "कोण आहोत आपण?" या प्रश्नाने कासावीस होतोय! आता पुरे झालं! समाज आता सज्ज झाला आहे — धोका देणाऱ्यांना धडा शिकवायला! राष्ट्रीय पवार महासभेच्या खोटारडेपणाला सडेतोड विरोध!

२००७ साली नोंदणीकृत 'राष्ट्रीय पवार महासभा' नावाची संस्था पोवार आणि भोयर समाज एकच असल्याचा हास्यास्पद आणि घातक दावा करत आहे. पण पोवार समाजाने यावेळी शांत राहायचं नाही ठरवलंय! इतिहास सांगतो – आम्ही स्वतंत्र होतो, आहोत आणि राहणार!

१७व्या शतकात राजा बख्त बुलंदच्या बोलावणीनं आलेल्या पोवार वंशाने वैनगंगा काठची माती, संस्कृती आणि ओळख घडवली. आमची मयबोली, आमचे रितीरिवाज, आमचे पूजन – आमचं सगळंच वेगळं आहे! २२ जूनला गोंदिया येथे "जातीय खबराकरण" होतंय — पण आम्ही भिडणार! या कार्यक्रमातून पोवार आणि भोयर समाज एकच आहेत, असा खोटा भ्रम पसरवण्याचा डाव आहे. समाजानं याला ठणकावून विरोध केलाय. या मंचावर पोवार समाजाचा कोणीही गेलेला आढळल्यास — तो "समाजद्रोही" ठरेल!

"नेते रोट्या शेकून गेले... आता जनता पेटून उठतेय!" जे आमदार, खासदार, मंत्री, आणि समाजाचे चेहऱ्यांवर हसत वावरणारे नेते आहेत, तेच आज समाजाच्या अस्मितेवर गदा आणणाऱ्या कार्यक्रमांना गुपचूप समर्थन देत आहेत. पोवार समाजाचा वापर करून मोठेपणा गाठणाऱ्यांनो – आम्ही विसरलो नाही, आणि आता माफ करणारही नाही! "पोवार म्हणजे पोवारच – इतर कोणीही नाही!"

गोंदियात झालेल्या पत्रकार परिषदेत इंजिनिअर गोवर्धन बिसेन, प्राचार्य खुशाल कटरे (से.), डॉ. हरगोविंद टेंभरे, श्री. कृष्णकुमार बिसेन, बी. आर. गौतम, डॉ. एल. एस. तुरकर, अकीत रहांगडाले यांनी ठाम भूमिका मांडली गेली. समाजाला जागे करणारा एल्गार!

जात बदलता येत नाही – ती परंपरेनं, इतिहासानं, वंशपरंपरेनं मिळते. कोणतंही महासभा, संस्था किंवा स्वार्थी गट याला बदलू शकत नाहीत!

अंतिम इशारा: "सामाजिक विलिनीकरणाची ही खेळी थांबवा, नाहीतर पोवार समाजाचा संताप थांबणार नाही!" ही बातमी पोवार समाजाच्या लढ्याचं रणभेरी आहे – जे ऐकतील, ते सजग होतील... जे दुर्लक्ष करतील, तेच पुरते झळतील!

शतायुषी हो बाळा..
दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....
आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी
फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या
चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर
आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस
दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह
आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# अंबिका मित्र मंडळ संचलित विद्यालयांमध्ये योग दिन उत्साहात संपन्न

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------





अंबिका मित्र मंडळ संचलित डॉ. डी. एस आहेर प्राथमिक विद्यालय डॉ.शालिनीताई बोरसे विद्यालय व माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात दिनांक २१/०६/२०२५, वार शनिवार रोजी विद्यालयात जागतिक योगा दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमास योगा शिक्षक सतीश घोगरे सर-निसर्गोपचार तज्ञ व निसर्गराज योगा & नेचरझोन गंगापूर रोड, नाशिक. येथील संचालक तसेच त्यांचे बंधू उद्देश घोगरे व मनीषा पाटील मॅडम यांनी विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या प्रांगणात योगा व प्राणायाम याचे मोलाचे प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना योगा प्राणायाम चे महत्व सांगून रोज एक तास योगा व प्राणायाम करण्याचा मोलाचा संदेश दिला. संस्थेचे सचिव मा. अमोल दादा पाटील यांनी आंतरराष्ट्रीय योग दिन २०२५ 'एक पृथ्वी एक आरोग्य 'या थीमच्या माध्यमातून निसर्गाचा आदर करावा असे सांगून पर्यावरणाचे संतुलन राखण्याची आणि सुसंवाद वाढविण्यात योगाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष मा. बाळासाहेब पाटील, सचिव मा.संदिप पाटील , शाळेचे प्रशासन अधिकारी मा.राजेंद्र सोनवणे, डॉ . डी.एस.आहेर शाळेच्या मुख्याध्यापिका मा .विद्या पाटील मॅडम, डॉ . शालिनीताई बोरसे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मा .कविता देवकर मॅडम तसेच माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक मा .भालेराव सर , मा.भाग्यश्री पवार मॅडम उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी तिन्हीही विद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका मा .प्रतिभा दिवे मॅडम यांनी केले. कार्यक्रम अतिशय सुंदर रित्या पार पडला.

# बाल शिक्षण मंदिर गोरेराम लेन नाशिक येथे अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------




मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या आदर्श शिशुविहार व बाल शिक्षण मंदिर गोरेराम लेन शाळेत शुक्रवारी अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी शाळेतील इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

**योग दिनाचे महत्त्व विशद केले**

कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेचे मुख्याध्यापक श्री. के. के. तांदळे यांनी प्रास्ताविक करताना योग दिनाचे महत्त्व विशद केले. ते म्हणाले, "२०१४ मध्ये मोदी सरकार आल्यानंतर दरवर्षी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जातो. संपूर्ण देशात व जगात एकाच वेळी योग दिन साजरा केला जातो." त्यांनी सांगितले की, २१ जून २०१५ या दिवशी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला होता.

**मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्याचा फायदा**

मुख्याध्यापक तांदळे यांनी योगाचे फायदे सांगताना म्हटले की, योग केल्यामुळे मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्य चांगले राहते. त्यांनी विविध योगासनांची सविस्तर माहिती देत विद्यार्थ्यांना योगाच्या महत्त्वाबद्दल जागरूक केले.

**शिक्षकांकडून व्यावहारिक प्रदर्शन**

कार्यक्रमात शाळेतील उपशिक्षक श्री जितेंद्र शेवाळे, श्री बदादे, श्री राहुल पाटील, श्री अंबादास पारधी आणि उपशिक्षिका श्रीमती वैशाली गावले यांनी विद्यार्थ्यांसमोर विविध योगासनांचे प्रकार करून दाखवले. त्यांनी पद्मासन, वज्रासन, ताडासन, हलासन, वृक्षासन, भुजंगासन आणि सूर्यनमस्कार इत्यादी योगासनांचे व्यावहारिक प्रदर्शन केले. त्यानंतर त्याच पद्धतीने विद्यार्थ्यांकडून योगासने करून घेतली. शिक्षकांनी योगासन का केले पाहिजे याचे महत्त्व देखील विद्यार्थ्यांना पटवून दिले.

**कार्यक्रमाची सुंदर मांडणी**

कार्यक्रमाचे फलक लेखन श्रीमती सविता पेखळे आणि श्रीमती शीतल गडाख यांनी केले होते. या संपूर्ण कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

या प्रसंगी विद्यार्थ्यांमध्ये योगाबद्दल जागरूकता निर्माण करण्यात यश आले आणि त्यांनी उत्साहपूर्वक सहभाग घेतला. आंतरराष्ट्रीय योग दिनाचे हे आयोजन अत्यंत यशस्वी ठरले.

# घोटीमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा सकाळच्या साक्षीने आरोग्याचा गजर!

देवेन्द्र दमाहे
गोंदिया जिला प्रतिनिधि
दैनिक स्वराज्यदूत
----------------------



सकाळी ६ वाजता गोरेगाव तालुक्यातील सुगत आश्रम शाळा, घोटी येथे आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यात आला. कार्यक्रमात विविध मान्यवरांची उपस्थिती आणि योगप्रेमींचा उस्फूर्त सहभाग यामुळे परिसरात एक आगळीच ऊर्जा निर्माण झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे बांधकाम सभापती डॉ. लक्ष्मण भगत होते. प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा जिल्हाध्यक्ष सौ. सिताबाई राहांगडाले, गोरेगाव पंचायत समितीच्या सभापती सौ. चित्रकला चौधरी, माजी नगराध्यक्ष आशिषजी बारेवार, माजी नगरसेवक सुरेंद्र पटले, इंजि. आनंद चंद्रिकापुरे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष डॉ. हितेश पारधी, तालुकाध्यक्ष डॉ. नारायण पटले, संघाचे तालुका कार्यवाह श्रीकांत चौधरी आदींचा विशेष सहभाग लाभला. शेकडो महिला, युवक आणि नागरिकांची उपस्थिती कार्यक्रमाला लाभली. योगाभ्यास, प्राणायाम, आणि विविध आरोग्यवर्धक सत्रांच्या माध्यमातून शरीर, मन आणि समाज आरोग्यदायी बनवण्याचा संकल्प घेण्यात आला. कार्यक्रमाचं संचालन आरोग्य भारती गोरेगावचे सचिव श्री. योगेश चौधरी यांनी प्रभावीपणे केलं. योगदिनानिमित्त शिस्त, एकात्मता आणि आरोग्याचा संदेश देत घोटी परिसरात अध्यात्मिक आणि सामाजिक चेतना निर्माण करण्यात आली.

# सेवेत नि:स्पृहता असावी - अमोल पाटील

## कला शिक्षक श्री. सुरेंद्र कदमबांडे यांना निरोप देताना सर्व शिक्षक गहिवरले

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------





आपल्या सेवेत कर्मचाऱ्याने निःस्पृह वृत्तीने कार्य करावे. अशी सेवाच समाज व ईश मान्य ठरते असे प्रतिपादन अंबिका मित्र मंडळ या शैक्षणिक संस्थेचे सचिव अमोल पाटील यांनी केले. डॉ. शालिनीताई बोरसे माध्यमिक विद्यालयाचे कला शिक्षक श्री. सुरेंद्र कदमबांडे यांच्या सेवा निवृत्ती कार्यक्रमात ते बोलत होते. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब पाटील होते. त्यांनीही श्री. सुरेंद्र कदमबांडे यांच्या संस्थेतील योगदान व समर्पणाची आठवण सांगितली. सत्काराला उत्तर देतांना श्री. कदमबांडे यांनी पंचवीस वर्ष सेवेचा आढावा घेऊन संस्था व शाळा याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. याप्रसंगी संस्था प्रशासन अधिकारी राजेंद्र सोनवणे, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कविता देवकर, विद्या पाटील, तसेच उज्वला कदमबांडे, ऋतुजा कदमबांडे आणि विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# कुराडी ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचाराचा भंडाफोड!

## राजकुमार गौतम यांचे आमरण उपोषण आंदोलन चौकशीवर संशयाची सावली!

देवेन्द्र दमाहे
गोंदिया जिला प्रतिनिधि
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------



कुराडी ग्रामपंचायतीतील कोट्यवधींच्या भ्रष्टाचाराचा आरोप करत ग्रामपंचायत सदस्य राजकुमार प्रीतीलाल गौतम यांनी थेट ६ जून २०२५ रोजी ग्रामपंचायत कार्यालयात आमरण उपोषणाची ठिणगी पेटवली. गौतम यांनी हायमास्ट लाईट, ठक्करबाबा योजना, रस्ते-नाल्या व वॉटर एटीएम या योजनांमधील २०२३ ते २०२५ दरम्यान झालेल्या कामांमध्ये भयानक आर्थिक घोटाळ्याचा ठपका ठेवला आहे. त्यांच्या रोखठोक आंदोलनामुळे प्रशासनाची झोप उडाली असून, प्रकरणाने आता मोठा राजकीय व प्रशासकीय वळण घेतले आहे.

**थेट सरपंच व ग्रामसेवकांवर आरोप!**

गौतम यांनी गावातील सरपंच अनिल मळावी आणि ग्रामविकास अधिकारी शिवानंद गौतम यांच्यावर थेट भ्रष्टाचाराचे आरोप करत दोषींवर तात्काळ कारवाईची मागणी केली. त्यांच्या उपोषणाची दखल घेत, पंचायत समितीचे सभापती, अधिकारी, जिल्हा परिषद सदस्य आणि गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. अधिकार्यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर गौतम यांनी उपोषण तात्पुरते मागे घेतले. मात्र त्यांनी साफ शब्दात सांगितले की, "हे फक्त सुरुवात आहे, पारदर्शक चौकशी झाली नाही, तर पुन्हा उपोषण पेटेल."

**'मौका चौकशी' चा फार्स?**

याच पार्श्वभूमीवर विस्तार अधिकारी बोरकर यांनी "मौका चौकशी" करून हात झटकले. त्यांनी जबाबदारी झटकत सांगितले की, "तांत्रिक चौकशी आमच्या अखत्यारीत नाही." त्यानंतर २० जून रोजी तांत्रिक अभियंते खोब्रागडे आणि अमोल शेभेकर यांच्या नेतृत्वाखाली तपासणी करण्यात आली. मात्र चौकशीच्याच प्रक्रियेवर गौतम यांनी गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करत सांगितले –
> " हे सगळं एकमेकांना वाचवण्याचा खेळ सुरू आहे. गावातील राजकीय दबावमुळे चौकशी फक्त नावापुरतीच केली जात आहे. आम्ही विकासविरोधी नाही, पण भ्रष्टाचार खपवून घेतला जाणार नाही!"

**पुन्हा उपोषणाची चेतावणी!**

गौतम यांनी स्पष्ट इशारा दिला की, "जर चौकशी खर्या अर्थाने पारदर्शक नसेल, तर मी पुन्हा आमरण उपोषण सुरू करणार. यावेळी लढा निर्णायक ठरेल."

**सत्ता-प्रशासन आणि भ्रष्टाचारात साटेलोट?**

संपूर्ण प्रकरणावरून असा स्पष्ट संकेत मिळतो की, कुराडी ग्रामपंचायतीत विकासाच्या नावावर वर्षानुवर्षे भ्रष्टाचाराचा महास्फोट झाला असून, यामध्ये स्थानिक सत्ताधाऱ्यांचा संल्गन संभवतो.

**प्रशासनाला सवाल:**

चौकशी केवळ औपचारिकतेपुरतीच का?
दोषी अधिकारी आणि लोकप्रतिनिधींवर केव्हा होणार कारवाई?
गावकऱ्यांचा विश्वास संपादन करण्यासाठी कोणती ठोस पावले उचलली जाणार?
"गाव जागं झालंय – आता चौकशी नव्हे तर कारवाई पाहिजे!"

# शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे

## पावसाअभावी खरीपाची पिके धोक्यात; शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
-------------------



यंदाच्या खरीप हंगामात पुर्व मोसमी पाऊस मे महिन्यात झाला तसेच मृग नक्षत्राच्या सुरुवातीला देखील जोरदार पाऊस झाला तसेच असंख्य हवामान अभ्यासकांच्या मते जुन महिन्याच्या दुसऱ्या व तिसऱ्या आठवड्यात अतिवृष्टी सदृश पाऊस होईल असे व्हिडिओ समाजमाध्यमांत मोठ्या प्रमाणात पसरवण्यात आले त्याच अनुषंगाने

तालुक्यात जूनच्या सुरुवातीलाच पावसाची आगमनाची चिन्हं दिसून आली होती. त्यामुळे अनेक शेतकर्यांनी पावसावर विश्वास ठेवून पहिल्या हप्त्यात पेरण्या सुरू केल्या. काही भागात पेरणी पूर्ण झाली होती, पण नंतर अचानक पावसाने पाठ फिरवली. आता तब्बल आठ-दहा दिवसांपासून पाऊस अवकाळीचा वेश घेत असल्याने पेरलेल्या बियाण्यांची उगम होऊ न शकल्यामुळे ती वाया जाण्याच्या मार्गावर आहे तसेच पावसाच्या दडी मारल्याने काही प्रमाणात उगवलेली सोयाबीन,कापूस,तुर, उडीद व मुग ही पिके उन्हाच्या चटक्यांमुळे व सोसाट्याच्या वाऱ्यामुळे शुष्काशित झाल्यामुळे करपून जात आहेत यांमुळे आता नुकसान दिसू लागले असून, दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांसमोर उभे टाकले आहे.

शेतकर्यांनी पेरणीसाठी पतसंस्था, बँका आणि खासगी सावकारांकडून कर्ज घेतले. आता दुबार पेरणी करायची तर पुन्हा खर्च लागणार, पण पहिल्याच पेरणीचं उत्पादन मिळालं नाही. त्यामुळे 'कर्ज फेडायचं कसं?' हा यक्षप्रश्न शेतकर्यांना छळतोय याकारणे तालुका प्रशासनाने कृषी व महसूल विभागाने नजरपाहणी करुन होत असलेल्या नुकसानीची प्राथमिक नोंद करुन तात्काळ शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी पाऊले उचलावी अन्यथा शेतकरी आर्थिक व मानसिक संकटात सापडला जाण्याची शक्यता आहे.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

# भ्रष्टाचाराला खतपाणी! लाचखोर कर्मचाऱ्याला जबाबदारीचे पद! काँग्रेसचा जिल्हा शल्य चिकित्सकांना इशारा!

देवेन्द्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधि
दैनिक स्वराज्यदूत

--------------------



जिल्हा सामान्य रुग्णालय, गोंदिया येथे अनेक वर्षांपासून कार्यरत समाजसेवक दिलीप ब्राम्हणकर यांना नियम धाब्यावर बसवत कनिष्ठ लिपिकाच्या पदावर बसविण्यात आले आहे. समाजसेवकाच्या मूळ कामाचा मागमूसही न ठेवता त्यांच्याकडून प्रमाणपत्र विभागात दस्तऐवजांची प्रक्रिया करून घेतली जात आहे. हा स्पष्टपणे प्रशासनाच्या नियमांचा आणि शासकीय धोरणांचा भंग आहे.

विशेष बाब म्हणजे, दिलीप ब्राम्हणकर यांच्यावर A C B कडून स्पेशल केस नंबर ACB/६०००६/२०१३ अंतर्गत लाचखोरीचा गुन्हा दाखल असून तो सध्या जिल्हा न्यायालय क्रमांक २ मध्ये प्रलंबित आहे. नियमांनुसार अशा लाचखोर कर्मचाऱ्याला पुन्हा त्याच ठिकाणी किंवा महत्त्वाच्या पब्लिक रिलेशन टेबलवर नेमणूक देणे निषिद्ध असताना, तरीदेखील त्यांना त्या पदावरच पुन्हा नेमले गेले आहे.

या सगळ्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने आक्रमक भूमिका घेत शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. योगेश अग्रवाल बापू यांनी जिल्हा शल्य चिकित्सकांना लेखी इशारा दिला आहे. या पत्रात त्यांनी स्पष्ट म्हटले आहे की, जर संबंधित लाचखोर कर्मचाऱ्याला तत्काळ पदावरून हटवून त्याची समाजसेवक पदावरच नियुक्ती केली नाही, तर काँग्रेस पक्षाला तीव्र आंदोलन उभारावे लागेल आणि याची पूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील. पत्राच्या प्रती उपसंचालक, सार्वजनिक आरोग्य विभाग (नागपूर) आणि जिल्हाधिकारी कार्यालय (गोंदिया) यांनाही देण्यात आल्या असून, लवकरच या प्रकरणाचा भडका उडण्याची शक्यता आहे. " भ्रष्टाचार करणाऱ्यांना प्रोत्साहन देणारे अधिकारीच लोकांच्या आरोग्याशी खेळत आहेत, हे अतिशय धक्कादायक आहे!" – ॲड. योगेश अग्रवाल बापू गोंदिया शहर काँग्रेसने प्रशासनाला दिलेला इशारा आता जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापवण्याची शक्यता निर्माण झाली आहे! यावेळी उपस्थित काँग्रेस कमिटी चे पदाधिकारी राजेंद्र दुबे, मनीष चौहान, सुनील गजभिये अमन रोघातिया, पवन नागदेव, प्रकाश आंबेडारे बहुसख्येने उपस्थित होते

# स्पार्क फाऊंडेशन कडून शैक्षणिक साहित्याचे वाटप

सौरभ कामडी
मोखाडा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------



शैक्षणिक वर्ष सुरू झाले की मुलांना नवीन कपडे , पुस्तके, बूट शासनाकडून मिळतात . मात्र लेखन साहित्य पालकांना बाजारातून विकत घ्यावे लागते , ग्रामीण भागातील मोलमजुरी करणारे, पालक वर्षभराच्या मजुरीतून साठवलेले पैसे पेरणीच्या आणि शेतीच्या कामासाठी वापरतात मग मुलांना असे महागडे साहित्य कुठून घेणार . हीच अडचण शाळेचे मुख्याध्यापक श्री. दिनकर फसाळे यांनी ग्रामीण भागात शैक्षणिक काम करणारी स्पार्क फाऊंडेशन चे अध्यक्. मकरंद दिक्षित , नितीन पिठोले यांच्या लक्षात आणून दिली. आणि आज दिनांक २०/०६/२०२५० रोजी जिल्हा परिषद शाळा कोचाळे येथे शाळेतील एकूण १२६ मुलांना , दुरेघी, चार रेघी, बॉक्स , चित्रकला वह्या, अंकलीपी, आणि पेन, पेन्सिल, खोडरबर, शॉपनर, रंगखडू , कंपास पेटी, इत्यादी वर्षभर पुरेल एवढ शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले . प्रसंगी स्पार्क फाऊंडेशन चे जिल्हा प्रमुख नितीन पिठोले, शाळेचे सर्व शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते . स्पार्क फाऊंडेशन चे हे शैक्षणिक कार्य ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामात गेल्या तीन चार वर्षापासून हातभार लावत आहे .

# गुलताई फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड संचलित वाघदेव भाजीपाला मार्केटमध्ये 'एक शेतकरी, एक झाड' संकल्पनेतून १०१ हापूस आंब्यांचे वाटप!

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------





साक्री तालुक्यातील सितारामपुर येथील गुलताई फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड संचलित वाघदेव भाजीपाला मार्केटने आज एक स्तुत्य उपक्रम राबवत, ग्रामीण भागाच्या विकासासाठी आणि पर्यावरणाच्या संवर्धनासाठी एक महत्त्वाचे पाऊल टाकले. या ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या वृक्षारोपण आणि वृक्ष वाटप कार्यक्रमाला परिसरातील शेतकरी आणि मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

या प्रेरणादायी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी प्रेरणा पुरस्कार प्राप्त, विरखेल येथील माननीय श्री. भटू विनायक भदाणे हे होते. त्यांच्या अनुभवाच्या मार्गदर्शनाने कार्यक्रमाला एक वेगळीच उंची प्राप्त झाली. तसेच, प्रमुख पाहुणे म्हणून माजी पंचायत समिती सदस्य श्री. काळु शंकर पवार (मंडाणे), संजय भदाणे (विरखेल), गुलाब शंकर पवार (मंडाणे), श्री. दिलीप पवार (मंडाणे) आणि हिरालाल भदाणे (विरखेल) हे उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढवली.

यावेळी, गुलताई फार्मर प्रोड्युसर कंपनीचे अध्यक्ष श्री. राजमल भोये आणि सचिव सौ. हिराभोये यांनी पुढाकार घेऊन "एक शेतकरी, एक झाड" ही अभिनव संकल्पना प्रत्यक्षात आणली. या संकल्पनेअंतर्गत, सर्व उपस्थित सभासदांना तब्बल १०१ केसर आंब्याची रोपे वाटप करण्यात आली. कंपनीचे सदस्य सौ. मालती पवार, श्री. भीमराव पवार, अजय चौधरी, अरुण गवळी, संजय ठाकरे यांच्यासह इतर सर्व सभासद आणि कर्मचारी या कार्यक्रमाला उपस्थित राहून त्यांनी या उपक्रमाला पाठिंबा दर्शवला.

या उपक्रमामागील उद्देश स्पष्ट करताना श्री. राजमल भोये यांनी सांगितले की, "आपल्या ग्रामीण भागातील निसर्गरम्य आणि आरोग्यदायी वातावरण टिकवून ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर, या झाडांपासून मिळणाऱ्या फळांमुळे शेतकऱ्यांना एक नवीन आणि शाश्वत रोजगाराची संधी उपलब्ध होईल. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही बळकटी मिळेल."

ज्या कोणत्याही शेतकऱ्यांना अजूनही झाडांची आवश्यकता असेल, त्यांनी वाघदेव मार्केट, मंडाणे येथे संपर्क साधून रोपे मिळवावीत, असे आवाहनही याप्रसंगी करण्यात आले. या कार्यक्रमामुळे केवळ पर्यावरणाचे रक्षणच नाही, तर शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य आणण्याची एक नवी दिशा मिळाली आहे.

# उप जिल्हा रुग्णालय देगलूर येथे १३ रुग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया संपन्न

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

------------------------



देगलूर उप जिल्हा रुग्णालय देगलूर येथे डॉ. भालचंद्र स्मृती दिन प्रित्यर्थ जागतिक दृष्टी दिन पंधरवाडा १० जुन ते २४ जुन च्या निमित्ताने मा. जिल्हा शल्यचिकिस्तक डॉ. संजय पेरके सर, मा. अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अपनगिरे सर.. डी. पी. एम. डॉ. तडवी मॅडम,वैद्यकीय अधीक्षक नरेश देवणीकर सर, भूलतज्ज्ञ डॉ. अनिल थडके..जिल्हा नोडल अधिकारी चंदनकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. सदरील मोहिमेअंतर्गत २५ रुग्णांवर यशस्वीरित्या मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली.उप. जिल्हा रुग्णालय देगलूर येथे माहे ०१ एप्रिल २०२५ ते २१ जून २०२५ पर्यंत ऐकून ६८ रुग्णाची नेत्र शस्त्रक्रिया करण्या आल्या.सदर शस्त्रक्रिया डॉ. सुधाकर तहाडे, डॉ. तडवी मॅडम, डॉ.लखमावार व डॉ. नाईक सर यांनी केल्या. सदर शिबीर यशस्वितेसाठी सर्व अधिकारी, कर्मचारी,नेत्रचकित्सा अधिकारी श्री.प्रशांत मांजरमकर, श्री. गंगाधर कसबे, श्री. शुभम जाधव, ओ. टी. सहाय्यक श्री. शिवाजी पवार , आधिपरिचरिका श्रीमती बोइनवाड, श्रीमंती मोमिन सिस्टर..श्रीमती धुमाळे, श्रीमती भंडारवाड सिस्टर, श्रीमती कदम सिस्टर व जमील मामा यांनी परिश्रम घेतले. या पुढील दरमहा नेत्र शिबीर होणार आहे तरी गरजू रुग्णांनी शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन उप जिल्हा रुग्णालय देगलूरचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश देवणीकर यांनी केले.

# नांदगाव तालुक्यात विविध विद्यालयात योग दिन उत्साहात साजरा

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------






### होरायझन अकॅडमीत योग दिवस साजरा

दरवर्षी २१ जून हा दिवस जागतिक योगदिन म्हणून साजरा केला जातो या निमित्ताने मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे होरायझन अकॅडमी नांदगाव शाळेत जागतिक योगदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या वेळी विद्यार्थ्यांनी प्राणायाम व योगासनाचे प्रात्यक्षिके सादर केले.त्यात कपालभाती, अनुलोम, भ्रामरी, आदी प्राणायाम आणि सूर्यनमस्कार, वृक्षासन, ताडासन, वज्रासन, पद्मासन,शवासन,अर्धचक्रासन, त्रिकोनासान, शाशंकासान, भुजंगासन, आदी आसने केली त्यांना मार्गदर्शन शाळेचे क्रीडा शिक्षक पृथ्वीराज वडघुले यांनी केले.

शालेय प्राचार्या श्रीमती.पुनम मढे यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.व शालेय शिक्षिका श्रीमती.शरयू आहेर यांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात योगासनाचे महत्व सांगितले व प्रतिज्ञा दिली. या कार्यक्रमासाठी सूत्रसंचालन स्वप्ना जाधव यांनी केले. या कार्यक्रमासाठी शाळेचे सर्व शिक्षक,शिक्षिका शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### जे. टी. कासलीवाल स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योगा दिन साजरा

जे.टी. कासलीवाल इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये आंतरराष्ट्रीय योगा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेतील सर्व विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आंतरराष्ट्रीय योग दिवसाला शाळेत उपस्थित होते. शाळेतील क्रिडा शिक्षक श्री.अशोक बागूल यांनी सर्व विद्यार्थ्यांना योग अभ्यास शिकवला. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी देखील आनंदाने शिकवलेले योगा प्रात्यक्षिक पूर्ण केले. क्रिडा शिक्षक यांनी जमलेल्या सर्वांना योगाचे महत्व पटवून दिले व सतत योगा करण्यास प्रोत्साहन दिले. दैनंदिन जीवनात योगाचा अंगीकार करून तो त्यांच्या दैनंदिन जीवनाचा एक भाग बनवण्यासाठी विद्यार्थ्यांनी योगाची वेगवेगळी आसने केली. अशाप्रकारे स्कूलचे प्राचार्य श्री. मनी चावला, सौ. क. मा. कासलीवाल माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक गोरख डफाळ, शरद पवार, क्रीडा शिक्षक अशोक बागुल, संजय त्रिभुवन तसेच शाळेतील सर्व सहकारी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्या उपस्थितीत हा आंतरराष्ट्रीय योगदिवस साजरा झाला.

सर्व सहभागी विद्यार्थी , शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना संस्थेचे चेअरमन मा. सुनीलकुमार कासलीवाल, सचिव विजय चोपडा, सहसचिव प्रमिलाताई कासलीवाल, सुशिलभाऊ कासलीवाल, जुगलकिशोर अग्रवाल, रिखबचंद कासलीवाल, महेंद्र भाऊ चांदिवाल,प्रकाश गुप्ता इत्यादींनी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

### कासलीवाल विद्यालयात जागतिक योग दिन उत्साहात साजरा

सौ. कमलाबाई माणिकचंद कासलीवाल माध्यमिक विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन निसर्गरम्य वातावरणात, प्रफुल्लित मनाने उत्साहात साजरा करण्यात आला. योगसाधनेचा हा कार्यक्रम म्हणजे तन-मन-आत्म्याच्या समतोल साधनेचा उत्सव ठरला.

यावेळी विद्यालयाच्या मैदानावर विद्यार्थ्यांनी सूर्यनमस्कार व विविध योगासने शिक्षकांसह केली.संजय शिवदे,शरद पवार ,संदीप आहेर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक गोरख डफाळ यांनी योगाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी नियमित योगासने करण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

शाळेतील शिक्षकांनीही उत्स्फूर्तपणे विविध योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक सादर केले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांकडूनही शिस्तबद्धतेने योगासने करून घेतली गेली. सूर्यनमस्कार, ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, त्रिकोणासन, सर्वांगासन, हलासन, व प्राणायाम यांचे अत्यंत सुरेख प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी सादर केली, ज्यातून त्यांच्या शरीर-मनातील ऊर्जा ओसंडून वाहताना दिसली.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त संस्थेचे चेअरमन मा. श्री. सुनिलकुमार कासलीवाल, उपाध्यक्ष सुशील कासलीवाल, सचिव विजय चोपडा, प्रशासक प्रकाश गुप्ता , सहसचिव प्रमिलाताई कासलीवाल,विश्वस्त रिखबचंद कासलीवाल, जुगलकिशोर अग्रवाल, महेंद्र चांदिवाल, आनंद कासलीवाल, दिलीप पारख,प्रिन्सिपल मनी चावला मुख्याध्यापक गोरख डफाळ तसेच प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.विशाल सावंत यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या.

### एम.डी.काळे इंग्लिश मीडियम पब्लिक स्कूल, तांदुळवाडी.

२१ जुन हा दिवस संपूर्ण विश्वभरात आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा केला जातो. निरोगी शरीर व स्वस्थ मनासाठी योगा करणे खूप आवश्यक असते. सण २०१५ पासून हा दिवस आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरा केला जातो. त्याचप्रमाणे एम.डि.काळे इंग्लिश मीडियम पब्लिक स्कूल मधे आज योगाचे धडे घेण्यात आले विद्यार्थी यांना योगाबद्दल माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व योगाचे धडे मेघा पवार व प्रभाकर आहेर सर यांनी दिले. त्याचप्रमाणे शाळेचे संस्थापक श्री दिनेश काळे सर प्रिन्सिपल श्रीमती नेहा काळे मॅडम व वाईस प्रिन्सिपल साक्षी अहिरे मॅडम यांनीही विद्यार्थ्यांना योगा मुळे काय काय फायदे होतात याबद्दल मार्गदर्शन केले व शिक्षक वंदना इंगोले, दीपिका बोरसे, अर्चना इंगोले, प्राजक्ता काकळीज, कविता आयनोर भाग्यश्री सूर्यवंशी,पूजा झेंडे ,नुतन खैरनार, पाटील सर, वंदना बाहिकर,यांनीही सहकार्य केले. यावेळी शाळेचे मैदानही गर्दीने फुलून गेले होते. पालकांनी ही योगा दिनाचा आनंद घेतला होता व त्यांनीही प्रात्यक्षिक केली होती. असा हा सगळ्यांच्या सहभागासह योगा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

# ॲग्रोकेअर कृषी मंच नाशिकतर्फे १९ वा राज्यस्तरीय 'स्वर्गीय वसंतराव नाईक कृषी प्रेरणा पुरस्कार' जाहीर

## मा. नामदार छगन भुजबळ यांच्या हस्ते होणार गौरव सोहळा

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------

शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी कार्य करणाऱ्या ॲग्रोकेअर कृषी मंच नाशिक संस्थेचा १९ वा राज्यस्तरीय 'स्वर्गीय वसंतराव नाईक कृषी प्रेरणा पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. संस्थेच्या १८ व्या वर्धापन दिनानिमित्त व कृषी दिनाचे औचित्य साधून हा पुरस्कार सोहळा भव्यदिव्य स्वरूपात निफाड, जिल्हा नाशिक येथे संपन्न होणार आहे.

या वर्षी राज्यभरातून निवडलेल्या ३१ मान्यवर व्यक्तींना विविध कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री मा. नामदार छगन भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि हस्ते हे पुरस्कार वितरित करण्यात येतील. या कार्यक्रमाला दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे खासदार मा. भास्कर भगरे, निफाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. दिलीप बनकर, तसेच ॲग्रोकेअर कृषी मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. भूषण निकम हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पुरस्काराची अधिकृत घोषणा *संस्थेच्या संचालिका सौ. रोहिणी पाटील* यांनी नुकतीच प्रसिद्ध माध्यमांतून केली आहे.

यानिमित्ताने एक विशेष आकर्षण म्हणजे *'कृषी संवाद' * या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून राज्यातील शेतकरी बांधवांसाठी हे खुले व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या संवादातून आधुनिक शेती, तंत्रज्ञान, शाश्वत विकास, कृषी उद्योजकता यावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

विशेष उपक्रम: आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदतीचा हात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही समाजदायित्व जपत आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुलांच्या शिक्षण व संगोपनासाठी रु. २, २५, ०००/- (दोन लाख पंचवीस हजार रुपये) धनादेश मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात येणार आहेत. ॲग्रोकेअरची ही सामाजिक बांधिलकी स्तुत्य आहे, असे मत अनेकांनी व्यक्त केले आहे.

### शेतकरी बांधवांना आवाहन:

या प्रेरणादायी कार्यक्रमास जास्तीत जास्त शेतकरी, उद्योजक, महिला बचतगट, विद्यार्थी व कृषीप्रेमींनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात येत आहे.

### १९ वा वसंतराव नाईक कृषी प्रेरणा पुरस्कार २०२५ मान्यवरांची यादी

संदीप जाधव , वैभव आहेर, सागर हिरे, यशवंत ठुबे, योगेश ढाकणे, सुभाष शिंदे, भास्कर पगार, रुपाली अहिरे ,डॉ. श्याम पाटील – नाशिक, भटू भदाणे– धुळे, ज्ञानेश्वर आवळे – पुणे, कृष्णा बनकर – पुणे, नागेश सोनटक्के – हिंगोली, राजमल भोये – धुळे, तानाजी मिंडे, हिराबाई शेटे, राजाराम चौधरी– पुणे, ओम सूर्यवंशी – छ. संभाजीनगर, धनंजय डांगे – छत्रपती संभाजीनगर, उमेश तट्टू – छत्रपती संभाजीनगर, सेगा पटले – नंदुरबार, मोरेश्वर घोडे – नागपूर, डॉ. शुभांगी घाडगे – राहुरी, घिर्णी प्रोड्यूसर कंपनी लि., विदर्भ समृद्धी कंपनी लि. बुलढाणा, सौरभ पाटील, कविता वाणी, गोपाल पाटील, अशोक जाधव – जळगाव, दत्तपुर्णा प्रोड्यूसर कंपनी लि. – अमरावती, किरण संखे – ठाणे